| Publisher/ Portal: Pudhari |
| --- |
| Date: 2nd April, 2018 |

पुढारी

# सौरऊर्जा हिटरमुळे विजेची आयुष्यभर बचत!

## पुण्यातील चर्चासत्रात तज्ज्ञांचे मत

**मुंबई : वार्ताहर**

सौर ऊर्जा हिटरची किंमत महाग असली तरी एकदा गुंतवणूक केल्यास त्याचा फायदा आयुष्यभर होईल. यासाठी नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्याची गरज आहे, असे मत सौरऊर्जा क्षेत्राशी निगडित तज्ज्ञांनी पुणे येथे चर्चासत्रातून व्यक्त केले. पूर्णपणे सूर्यप्रकाशावर आधारित सौरऊर्जा हिटरच्या वापरामुळे विजेची बचत होते, यामुळे सौर उर्जेवर चालणाऱ्या उपकरणांचा वापर करण्याचे आवाहन यावेळी तज्ज्ञांनी केले.

या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक झाल्यास सौरऊर्जा संबंधित उपकरणांच्या किंमती कमी होतील. सौरऊर्जा हिटरला लोकांचा म्हणावा तसा प्रतिसाद मिळत नसून या उपकरणाच्या खरेदीसाठी एकदा द्यावी लागणारी रक्कम ग्राहकांना मोठी वाटते. परंतु ही गुंतवणूक केवळ एकदाच असून त्यामुळे आयुष्यभर विजेच्या बिलापासून आपल्याला मुक्ती मिळते. सौर ऊर्जेवर चालणारी उपकरणे ही देशाच्या फायद्याची असल्याचे मत ऑरिस्टन थर्मो इंडियाचे महाव्यवस्थापक अनिल भामरे यांनी व्यक्त केले.

ते पुढे म्हणाले की, सौरऊर्जा हिटरची किंमत व सोलर पॅनल यंत्रणेचा आकार मोठा असल्यामुळे मर्यादित घरापुरता तो लावणे शक्य नसल्याने त्याला मागणी कमी आहे. मर्यादित घरापुरता लावला तर चीनच्या तुलनेत भारतात या सोलर पॅनलवर सूर्यप्रकाश अवघा २० टक्के पडतो, त्यामुळे याचा काहीच उपयोग नाही. सोलार पॅनेलवर कमीतकमी सूर्यप्रकाश ७० टक्के पडणे आवश्यक आहे.

My Mumbai Edition
2 Apr, 2018 Page No. 1
Powered by : erelego.com